25 MAY 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. जी. पी. माळी संपादित 'कोल्हापूरची शतमानपत्रे' ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डॉ. जयसिंगराव पवार, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. प्रकाश दुकळे, अमेय जोशी आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# मानपत्र लेखन इतिहास जमा होऊ नये, याची दक्षता घेण्याची गरज

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; 'कोल्हापूरची शतमानपत्रे' पुस्तकाचा प्रकाशन समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानपत्रे लेखन आणि वाचन ही अवघड कला आहे. मानपत्र लिहिणाऱ्यांचा सध्या दुष्काळ पडला आहे. मानपत्रे हा मोठा ठेवा असतो. ते लिहिणे इतिहास जमा होऊ नये, याची दक्षता घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.जी. पी. माळी यांनी गत शतकातील निवडक १०१ मानपत्रे संग्रहित करून सिद्ध केलेल्या 'कोल्हापूरची शतमानपत्रे' या ऐतिहासिक ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ऐतिहासिक ग्रंथांची प्रस्तावना मानपत्रात काय लिहू नये, हे सांगणारी आहे. मानपत्रांचा १०१ वर्षांचा प्रवास ग्रंथाने उलगडला आहे. मानपत्रात लिहिणाऱ्यांचा उल्लेख नसतो; मात्र त्या व्यक्ती, संस्थेचा सन्मान असतो.

> कोल्हापूरची शतमानपत्रे या ग्रंथात दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्या मानपत्रांचा समावेश आहे.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. पवार म्हणाले, मानपत्राचा ग्रंथ होऊ शकतो, ही गोष्ट चांगली आहे. अशा प्रकारचे ऐतिहासिक ग्रंथ मराठी साहित्यातील वेगळी कल्पना आहे. मानपत्रे कोल्हापूरच्या सांस्कृतिक इतिहासाची साधने आहेत. डॉ. जी. पी. माळी यांनी संपादकीय मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी ग्रंथाची ओळख करून दिली. प्रास्ताविक शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. पंडित कंदले, डॉ. मनीषा नायकवडी यांनी सूत्रसंचालन केले. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश दुकळे यांनी आभार मानले. यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व्यंकाप्पा भोसले, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव, डॉ. आर. एस.आडसूळ उपस्थित होते.

सकाळ



**कोल्हापूर : कमला कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक समारंभप्रसंगी राजलक्ष्मी कदम हिला आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार देताना डॉ. पी. एस. पाटील, डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील, डॉ. तेजस्विनी मुडेकर.**

# कमला कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक

**कोल्हापूर :** कमला कॉलेजचा वार्षिक पारितोषिक समारंभ झाला. प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख होते. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रभारी कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, ''कमला कॉलेजची शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कामगिरी उत्कृष्ट आहे. आपल्या शिवाजी विद्यापीठाने २७८ विद्यापीठात दहावा क्रमांक मिळविला आहे. विद्यार्थिनीला हार्ड वर्कपेक्षा स्मार्ट वर्क करून यश मिळवावे शिक्षणाची आस, अभ्यासाची ध्यास धरून ध्येयपूर्ती करता येते.'' प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी विद्यार्थिनींच्या शैक्षणिक विकासासाठी विविध तज्ज्ञांची व्याख्याने, विविध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, एन.सी.सी.चे उपक्रम महत्त्वाचे ठरतात. महाविद्यालयाची चौफेर प्रगती पाहून अ‍ॅटोनॉमस दर्जा दिला आहे, असे सांगितले. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात आदर्श विद्यार्थिनींचा पुरस्कार शुभांगी घराळ हिला तर कमलाची आदर्श विद्यार्थिनी म्हणून राजलक्ष्मी कदम हिला सॉर्ड ऑफ ऑनरचा पुरस्कार मिळाला. सचिव प्राजक्त पाटील उपस्थित होत्या. प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी, प्रा. डॉ. अनिल घस्ते, प्रा. डॉ. सुजय पाटील, प्रा. स्वाती कांबळे, डॉ. सुनीता काळे, प्रा. एच. व्ही. पुजारी, प्रा. वर्षा साठे यांचे सहकार्य लाभले. प्रा. डॉ. निता धुमाळ यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रेखा पंडित यांनी आभार मानले. प्रा. ए. एम. साळोखे, प्रा. एन. एस. शिरोळकर उपस्थित होते.

2 5 MAY 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : श्रीनगर येथे स्तुति सातदिवसीय प्रशिक्षण उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार एस. एस. कोहली.

# ‘स्तुति’ प्रशिक्षण कार्यक्रमास काश्मीर विद्यापीठात प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकारातून देशव्यापी उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र सरकारच्या स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतातून किमान १० हजार तज्ज्ञ प्रशिक्षित व्हावेत, अशी अपेक्षा केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार एस. एस. कोहली यांनी व्यक्त केली.

भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, शिवाजी विद्यापीठ आणि काश्मीर विद्यापीठ, श्रीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुति (सिनर्जिस्टीक ट्रेनिंग प्रोग्राम युटिलायझिंग दि सायंटिफिक अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) सातदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमास सोमवारपासून श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठात प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून स्तुति उपक्रम देशभरात राबविण्यात येत आहे. त्यातील हा दुसरा उपक्रम आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून काश्मीरच्या उपराज्यपालांचे सल्लागार आर. आर. भटनागर, काश्मीर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. निलोफर खान, काश्मीर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. तलत अहमद, अनंतनाग येथील इस्लामिक युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे कुलगुरू डॉ. शाकील रामशो आदी उपस्थित होते. २९ मे पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमांतर्गत वरिष्ठ तज्ज्ञ प्राध्यापक अत्याधुनिक वैज्ञानिक साधने व उपकरणे यांची प्रात्यक्षिकांसह माहिती देणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने येथील सैफ-सीएफसी केंद्राचे प्रमुख व स्तुति उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे हे काश्मीर येथे उपस्थित राहून कार्यक्रमाचे संयोजन करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
25 MAY 2022 पुण्यनगरी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्तुती' कार्यक्रमास काश्मीर विद्यापीठात प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकारातून देशव्यापी उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून संपूर्ण देशभरातून किमान दहा हजार तज्ज्ञ प्रशिक्षित व्हावेत, अशी अपेक्षा केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार एस. एस. कोहली यांनी व्यक्त केली. श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठात 'स्तुती' उपक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, शिवाजी विद्यापीठ आणि काश्मीर विद्यापीठ, श्रीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्तुती' (सिनर्जिस्टीक ट्रेनिंग प्रोग्राम युटिलायझिंग दि सायंटिफिक अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) या सात दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमास सोमवारी (दि. २३) श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठात प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून स्तुती उपक्रम देशभरात राबविण्यात येत आहे. त्यातील हा दुसरा उपक्रम आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून काश्मीरच्या उपराज्यपालांचे सल्लागार आर. आर. भटनागर, काश्मीर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. निलोफर खान, माजी कुलगुरू डॉ. तलत अहमद, अनंतनाग येथील इस्लामिक युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे कुलगुरू डॉ. शाकील रामशो आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातर्फे येथील सैफ-सीएफसी केंद्राचे प्रमुख व स्तुती उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे हे काश्मीर येथे उपस्थित राहून कार्यक्रमाचे संयोजन पाहत आहेत.

सकाळ

# काश्मीर विद्यापीठात 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रम

कोल्हापूर, ता. २४ : केंद्र सरकारच्या स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमातून किमान दहा हजार तज्ज्ञ प्रशिक्षित व्हावेत, अशी अपेक्षा केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार एस. एस. कोहली यांनी व्यक्त केली. केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, शिवाजी विद्यापीठ, आणि काश्मीर विद्यापीठातर्फे स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमास सुरुवात झाली. याच्या उद्घाटनप्रसंगी कोहली बोलत होते. श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठात प्रशिक्षण आयोजित केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून स्तुति उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यातील हा दुसरा उपक्रम आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून काश्मीरच्या उपराज्यपालांचे सल्लागार आर. आर. भटनागर, काश्मीर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. निलोफर खान, काश्मीर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. तलत अहमद, अनंतनाग येथील इस्लामिक युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. शाकील रामशो आदी उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमात १५० प्राध्यापक व विविध शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. रविवार (ता. २९) पर्यंत चालणाऱ्या उपक्रमांतर्गत तज्ज्ञ अत्याधुनिक वैज्ञानिक साधने व उपकरणे यांची प्रात्यक्षिकांसह माहिती देणार आहेत. येथील सैफ-सीएफसी केंद्राचे प्रमुख व स्तुति चे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांचा आयोजनात सहभाग आहे.

25 MAY 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# काश्मीर विद्यापीठात 'स्तुती' प्रशिक्षणास प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकारातून देशव्यापी उपक्रम : सात दिवस प्रशिक्षण

प्रतिनिधी
कोल्हापूर

केंद्राच्या स्तुती प्रशिक्षणाच्या माध्यमातून संपूर्ण भारतातून किमान दहा हजार तज्ज्ञ प्रशिक्षित व्हावेत, अशी अपेक्षा केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार एस. एस. कोहली यांनी व्यक्त केली.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि काश्मीर विद्यापीठ, श्रीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुती (सिनर्जिस्टीक ट्रेनिंग प्रोग्राम युटिलाइझिंग दि सायंटिफिक अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) या सात दिवसीय प्रशिक्षणास सोमवारी श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठात प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून हा उपक्रम देशभरात राबवण्यात येत आहे. त्यातील हा दुसरा उपक्रम आहे.



कोल्हापूर : श्रीनगर येथे स्तुती प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार एस. एस. कोहली.

प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी कोहली प्बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून काश्मीरच्या उपराज्यपालांचे सल्लागार आर. आर. भटनागर, काश्मीर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. निलोफर खान, माजी कुलगुरू डॉ. तलत अहमद, अनंतनाग येथील इस्लामिक युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे कुलगुरू डॉ. शाकील रामशो आदी उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात १५० प्राध्यापक व विविध संस्थांतील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. २९ मे पर्यंत या उपक्रमांतर्गत वरिष्ठ तज्ज्ञ प्राध्यापक अत्याधुनिक वैज्ञानिक साधने व उपकरणांची प्रात्यक्षिकांसह माहिती देणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्यावतीने येथील सैफ–सीएफसी केंद्राचे प्रमुख व स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे हे काश्मीर येथे उपस्थित राहून संयोजन पहात आहेत.

2 5 MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग'

## सांस्कृतिक आदान-प्रदान; ३०, ३१ ला कलाविष्कार

कोल्हापूर, ता. २४ : पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे ५१ विद्यार्थी शिवाजी विद्यापीठात येणार आहेत. सांस्कृतिक आदान-प्रदान कार्यक्रमांतर्गत ते 'महाराष्ट्र के रंग पंजाबके संग' हा सांस्कृतिक कलाविष्कार सादर करणार आहेत. सोमवार (ता. ३०) आणि मंगळवार (ता. ३१) या कालावधीत विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात कार्यक्रम होईल. सांस्कृतिक बंध घट्ट व्हावा हा उद्देश असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "१० ते १४ एप्रिल २०२२ कालावधीत शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी आणि पंजाबच्या लव्हली युनिव्हर्सिटीचे विद्यार्थ्यांत सांस्कृतिक आदान प्रदान झाले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी पंजाबमधील ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या. महाराष्ट्रातील कलाप्रकार पंजाबमधील विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखवले.

याचा पुढचा टप्पा म्हणून पंजाबच्या संघ शुक्रवारी (ता. २७) विद्यापीठात येणार आहे. शुक्रवार (ता. २७) ते मंगळवार (ता. ३१) या काळात शिवाजी विद्यापीठासह परिसरातील विविध ठिकाणी भेटी देऊन ऐतिहासिक, सांस्कृतिक तसेच येथील परंपरा आदींचा अभ्यास करणार आहे. पंजाबच्या टीममध्ये ५१ जणांचा समावेश आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संचालक आर. व्ही. गुरव हे उपस्थित होते.

### पंजाबी संस्कृतीची ओळख

पंजाबी पारंपरिक कलाप्रकार येथील विद्यार्थ्यांना, नागरिकांना समजावेत यासाठी पंजाबचे विद्यार्थी कलाप्रकार सादर करणार आहेत. दुपारी ३ ते सायंकाळी ६ या कालावधीत राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात घेतले जाणार आहेत.



पुण्यनगरी

# महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग!

## लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचा २७ पासून सांस्कृतिक दौरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव याच्या संयुक्त निमित्ताने विद्यापीठामार्फत सांस्कृतिक आदानप्रदान उपक्रमाचे आयोजन केले आहे. याअंतर्गत पंजाब येथील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या ५१ विद्यार्थ्यांचा संघ येत्या २७ मेपासून कोल्हापूरच्या दौऱ्यावर येत आहे. ही माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही टीम दि. २७ ते ३१ मे या काळात शिवाजी विद्यापीठासह कणेरी मठ, न्यू पॅलेस, भवानी मंडप, अंबाबाई मंदिर, महाद्वार रोड, मोतीबाग तालीम, कोल्हापुरी चप्पल लाईन, रंकाळा आदी परिसरात भेटी देऊन कोल्हापूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक संदर्भांची माहिती जाणून घेणार आहेत. याशिवाय पंजाबची लोकसंस्कृती, लोकनृत्य, लोकगीते तसेच पारंपरिक कला प्रकार विद्यापीठात सादर करणार आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठ संघाने पंजाबमध्ये सादर केलेला कलाविष्कारही सादर केला जाणार आहे. हे सादरीकरण दि. ३० व ३१ मे रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये केले जाणार आहे. पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते.

2 5 MAY 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग..!

## पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचा २७ पासून सांस्कृतिक दौरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आजादी का अमृतमहोत्सव व शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव या संयुक्त निमित्ताने विद्यापीठामार्फत सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमाचे आयोजन केले आहे. अंतर्गत पंजाबमधील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा संघ शुक्रवार , दि. २७ पासून कोल्हापूरच्या दौऱ्यावर येत आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमांतर्गत यापूर्वी ७ एप्रिल रोजी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा एक संघ पंजाब येथील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये १० ते १४ एप्रिलदरम्यान दाखल झाला. विद्यार्थ्यांनी देवी तालाब मंदिर, करतारपूर येथील जंग ए आजादी मेमोरियल, अमृतसरमधील सुवर्ण मंदिर, जालियनवाला बाग व वाघा बॉर्डर अशा ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोकधारा असलेले लोकनृत्य, लावणी, सुगम गायन, मूकनाट्य, देशभक्तीपर लघुनाटिका, वासुदेव, गोंधळ, आराधी, भारुड आदी महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित पंजाबमधील विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखवले.



### ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरांचा करणार अभ्यास

पंजाबचे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ परिसरासह कोल्हापुरातील कणेरी मठ, न्यू पॅलेस, भवानी मंडप, अंबाबाई मंदिर, महाद्वार रोड, मोतीबाग तालीम, कोल्हापुरी चप्पल लाईन, रंकाळा आदी विविध ठिकाणी भेटी देऊन ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करणार आहेत.

सांस्कृतिक आदान-प्रदानाचा पुढचा टप्पा म्हणून पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा ५१ जणांचा संघ दि. २७ ते ३१ मे रोजी शिवाजी विद्यापीठात असणार आहे. यानिमित्ताने भरगच्च कार्यक्रम आयोजित केले आहेत. पंजाबची लोकसंस्कृती, लोकनृत्य, लोकगीते व पारंपरिक कला प्रकार येथील विद्यार्थी, नागरिकांना समजावेत यासाठी पंजाबचे विद्यार्थी स्थानिक कलाप्रकार सादर करतील. महाराष्ट्राची लोकधारा, मूकनाट्य, देशभक्तीपर लघुनाटिका, महाराष्ट्रीयन वाद्यवृंद, भारतीय वाद्यवृंद, राग यमन कल्याणमधील विविध गायकांनी गायलेल्या विविध गाण्यांचे मुखडे असलेला कार्यक्रम सादरीकरण शिवाजी विद्यापीठाचा संघ सादर करणार आहे. हा कार्यक्रम ३० व ३१ मे रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते.

2 5 MAY 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नॅनो सायन्स 'च्या दोन विद्यार्थिनींना परदेशात संशोधनाची संधी

## दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलियातील विद्यापीठांकडून निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील अपराजिता ज्ञानेश्वर कदम (रा. अपशिंगे, सातारा) आणि रेश्मा शिवाजी शिंगटे (रा. जैनवाडी, सोलापूर) या विद्यार्थिनींची अनुक्रमे दक्षिण कोरिया व ऑस्ट्रेलिया येथील जागतिक क्रमवारीत अव्वल विद्यापीठांमध्ये पीएच. डी. संशोधनासाठी निवड झाली आहे. त्यासाठी त्यांना भरीव विद्यावेतनही मिळणार आहे.



रेशमा शिंगटे



अपराजिता कदम

विद्यापीठाच्या नॅनो सायन्स अधिविभागातील अपराजिता कदम आणि रेश्मा शिंगटे या विद्यार्थिनींनी सन २०२१ मध्येच एम.एस्सी.ची पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांना ही परदेशी संशोधन करण्याची संधी मिळाली आहे. अपराजिता यांची दक्षिण कोरियातील जागतिक क्रमवारीत ९७ व्या स्थानी असलेल्या सुंगक्युनक्कन विद्यापीठात वार्षिक १ अब्ज ५६ लाख कोरियन वोन (अंदाजे रुपये १० लाख) इतक्या विद्यावेतनासह तर रेश्मा यांची ऑस्ट्रेलियातील जागतिक क्रमवारीत १९३ व्या स्थानी असलेल्या वोलन्गाँग विद्यापीठामध्ये वार्षिक २८ हजार ८५४ ऑस्ट्रेलियन डॉलर्स (अंदाजे रुपये १६ लाख) इतक्या भरघोस विद्यावेतनासह पीएच.डी. संशोधनासाठी प्रवेश मिळाला आहे.

या विद्यार्थिनींना त्यांचे अधिविभागातील संशोधन प्रकल्प मार्गदर्शक डॉ. आरिफ शेख यांचे मार्गदर्शन लाभले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत

# 'नॅनोसायन्स'च्या दोघींना परदेशात पीएच.डी.ची संधी

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीतील अपराजिता ज्ञानेश्वर कदम (रा. अपशिंगे, सातारा) हिची दक्षिण कोरिया आणि रेश्मा शिवाजी शिंगटे (रा. जैनवाडी, सोलापूर) हिची आस्ट्रेलिया येथील विद्यापीठांमध्ये पीएच.डी. संशोधनासाठी निवड झाली आहे. त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मार्गदर्शक डॉ. आरिफ शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

अपराजिता कदम, रेश्मा शिंगटे यांनी गतवर्षी एम.एस्सी.ची पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांना परदेशी संशोधनाची संधी मिळाली आहे. अपराजिता यांची दक्षिण कोरियातील सुंगक्युनक्वान विद्यापीठात तर रेश्माची ऑस्ट्रेलियातील वोलन्गाँग विद्यापीठामध्ये विद्यावेतनासह पीएच.डी. संशोधनासाठी प्रवेश मिळाला आहे.





अपराजिता कदम रेश्मा शिंगटे

2 5 MAY 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रामीण मराठी साहित्य संमेलन शनिवारपासून

## निमशिरगावात आयोजन; डॉ. आनंद पाटील अध्यक्ष, भारत सासणे उद्‌घाटक, कुमार सप्तर्षी यांची उपस्थिती

दानोळी, ता. २४ : निमशिरगाव कला, क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक मंचतर्फे रौप्यमहोत्सवी व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूरचे संयुक्त ग्रामीण मराठी साहित्य संमेलन शनिवार (ता. २८) व रविवारी (ता. २९) होणार आहे. अध्यक्षपदी डॉ. आनंद पाटील आहेत. अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे उद्‌घाटक, तर महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष कुमार सप्तर्षी प्रमुख उपस्थित आहेत. ही माहिती पद्माकर पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार, भीमराव धुळबुळू, प्रा. शांताराम कांबळे, रावसाहेब पुजारी, सचिव गोमटेश पाटील यांनी दिली.

शनिवारी सकाळी ८.३० वाजता डॉ. सुकुमार मगदूम, डॉ. धवल एस. पाटील यांच्या हस्ते ग्रंथदिंडीने सुरवात होईल. मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन होईल. समारंभात 'देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार समाजरत्न पुरस्कार' डॉ. प्रभाकर पुसदकर, 'ज्येष्ठ साहित्यिक पी. बी. पाटील साहित्यरत्न पुरस्कार' डॉ. व्ही. एन. शिंदे आणि 'शेतकरीराजा पुरस्कार' कुलगुरू डॉ. एस. डी. सावंत यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. माजी खासदार राजू शेट्टी, गणपतराव पाटील, रावसाहेब पाटील बोरगावकर, वैभव नायकवडी उपस्थित राहणार आहेत.

पहिल्या सत्रात भारत सासणे यांची डॉ. अविनाश सप्रे प्रकट मुलाखत घेतील. दुसऱ्या सत्रात ज्योतिराम फडतरे यांचे कथाकथन होईल. त्यानंतर कवी संमेलन आहे. अध्यक्षस्थानी श्यामसुंदर मिरजकर आहेत. डॉ. सुनंदा शेळके सूत्रसंचालन करणार आहेत. सायंकाळी राष्ट्र सेवा दलाच्या स्मिता पाटील यांच्या कलापथकाचे 'पुन्हा गांधी' हे मुक्तनाट्य होईल. रविवारी बाबासाहेब नदाफ व रफिक पटेल 'चळवळीची गाणी' सादर करतील. त्यानंतर संविधान जागर, निमशिरगाव संविधान गाव याचे सादरीकरण होईल. 'बहुसांस्कृतिकता आणि साहित्य' या विषयावर परिसंवाद होईल. त्यामध्ये व्यंकटेश देवणपल्ली, डॉ. माया पंडित, प्रभाकर ढगे वक्ते आहेत. प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार अध्यक्षस्थानी आहेत. दुपारी डॉ. वसंत केशव पाटील यांची प्रकट मुलाखत डॉ. राजेंद्र कुंभार घेतील. दुपारी ३ वाजता रामदास फुटाणे, अरुण म्हात्रे, संजीवनी तडेगावकर, भरत दौंडकर, सुरेश मोहिते या निमंत्रित कवींची काव्यमैफल होणार आहे. डॉ. विजय चोरमारे सूत्रसंचालन करणार आहेत. सायंकाळी बहुभाषिक कवितांचे सादरीकरण, चित्रकार पार्श्वनाथ नांद्रे यांचा काव्य-चित्र संवाद होणार आहे.